स्क्रीन रिडरचा बादशहा

सांज दैनिक बीड RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव

भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

वास्तवी २१ वर्ष

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

सच करीब से ही दिखता है...!

● बीड ● मंगळवार, दिनांक ३१ मार्च २०२६ ● वर्ष २१ वे ● अंक : ५५ ● पाने : ४ http://epaper.beedvastav.com Email : beedvatsav@gmail.com ● किंमत ३ रुपये

# राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे बेपत्ता ! स्वत : ची जबाबदारी कळत नसेल तर घरी बसा !!

शंभरपेक्षा अधिक महिलांवर लैंगिक अत्याचारांचे व्हिडिओ समोर आले, तरीही मंत्री अदिती तटकरेंची कुठलीच प्रतिक्रिया नाही

आपल्या महिला व बालविकास मंत्री बेपत्ता असून या सर्व घटनांवर काही एक प्रतिक्रिया आपण त्यांची ऐकलीय का? : काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ

या मंत्री महोदयांना स्वत :ची जबाबदारी समजत नसेल, तर राजीनामे देऊन घरी बसावं ! उगाच मंत्रीपदाची खुर्ची उबवू नये : सपकाळ

## महिला भगिणींसोबत अत्याचाराचे प्रकरणं समोर येत असताना मंत्री तटकरे गप्प का?

**मुंबई : प्रतिनिधी**

**मागील काही दिवसांपासून नाशिकचा भोंदूबाबा अशोक खरात प्रकरण चांगलेच गाजत आहे. महिलांवरील शंभरपेक्षा अधिक लैंगिक अत्याचारांचे व्हिडिओ समोर आले आहेत. तसेच आर्थिक फसवणुकीचे देखील गुन्हे खरातवर दाखल झाले आहेत. विशेष लक्ष वेधले गेले ते त्याच्या लैंगिक अत्याचारांच्या घटनांमुळे. मात्र, असे असूनही राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांच्याकडून यावर अद्याप कुठलीच प्रतिक्रिया आलेली नाही. यावरून काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी टीका केली आहे. आपली जबाबदारी माहीत नसेल तर राजीनामे देऊन घरी बसावे, असे सपकाळ यांनी टीका करताना म्हंटले आहे. दरम्यान याबाबत ' दिव्य मराठी 'ने डिजिटल आवृत्तीमध्ये सविस्तर वृत्त प्रकाशित केले आहे.**




### मी माझ्या भावना वेगवेगळ्या प्रसंगी, वेगवेगळ्या व्यासपीठांवर मांडल्या !!

● पुढे बोलताना अदिती तटकरे म्हणाल्या, राज्यातील सक्षम महिला पोलिस अधिकारी तेजस्वी सातपुते यांच्याकडे या प्रकरणाच्या चौकशीचे नेतृत्व सोपवण्यात आले आहे. माननीय मुख्यमंत्री व संपूर्ण मंत्रिमंडळासोबत एक मंत्री व एक महिला म्हणून या प्रकरणाबाबत माझ्याही भावना अत्यंत तीव्र आहेत.

● या भावना मी वेगवेगळ्या प्रसंगी, वेगवेगळ्या व्यासपीठांवर ३-४ वेळा मांडल्या आहेत.

● या प्रतिक्रियांच्या लिंक्स मी खाली जोडत आहे. महिलांच्या सन्मानासाठी, सक्षमीकरणासाठी व न्यायासाठी महिला व बालविकास विभाग सदैव तत्पर आहे, सज्ज आहे. महिलांवर होणारा कोणताही अन्याय खपवून घेणार नाही या आमच्या भूमिकेचा मी पुनरुच्चार करते, असेही तटकरे यांनी म्हटले आहे.

### पिडीत महिलांना न्याय मिळेल, असा विश्वास देणारं ट्विट किंवा पोस्टही नाही !!

● राज्यातील पिडीत महिलांना न्याय मिळेल, असा विश्वास देणारं ट्विट किंवा पोस्ट तरी त्यांनी केलीय का? जर या मंत्री महोदयांना स्वत :ची जबाबदारी काय आहे, हेच समजत नसेल, तर यांनी राजीनामे देऊन घरी बसावं. आणि आपल्या वैयक्तिक आयुष्यात वेळ घालवावा. उगाच मंत्रीपदाची खुर्ची उबवू नये, असा टोलाही हर्षवर्धन सपकाळ यांनी लगावला आहे.



### सपकाळांच्या टीकेनंतर अदिती तटकरेंचे स्पष्टीकरण

हर्षवर्धन सपकाळ यांनी केलेल्या टीकेनंतर मंत्री अदिती तटकरे यांनी ट्विट केले आहे. त्यांनी ट्विट करत म्हटले की, नाशिकच्या भोंदूबाबा खरात प्रकरणात चौकशीच्या दृष्टीने व न्यायाच्या दृष्टीने सरकार अगदी सुरुवातीपासूनच तत्पर आहे. राज्याचे प्रमुख आदरणीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांनी तत्परतेने SIT स्थापन करून, अशोक खरातला अटक करून कारवाईला गती दिली आहे.

### आपल्या महिला व बालविकास मंत्री बेपत्ता?

● या आहेत आपल्या राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे. राज्य सरकारमधील महिलांचा आवाज किंवा महिलांची जबाबदारी असलेल्या खात्याच्या त्या मंत्री आहेत, असे म्हणत हर्षवर्धन सपकाळ यांनी अदिती तटकरे यांचा फोटो शेअर करत टीका केली आहे. ते म्हणाले, मागील काही दिवसांमध्ये खरात प्रकरण असो, यात यांच्या खात्याअंतर्गत येणाऱ्या महिला आयोगाच्या अध्यक्षांवर झालेले आरोप असो, हृषीकेश वैद्य, काल समोर आलेलं नवी मुंबईतील आदर्श म्हात्रे प्रकरण असो, रोज राज्यातील महिला भगिणींसोबत अत्याचार झाल्याच्या बातम्या, प्रकरणं समोर येत आहेत. पण, आपल्या महिला व बालविकास मंत्री बेपत्ता आहेत. या सर्व घटनांवर काही एक प्रतिक्रिया आपण त्यांची ऐकलीय का? किंवा या प्रकरणानंतर याबाबत त्यांच्या खात्याअंतर्गत यावर एखादी बैठक घेतली काय? याबाबत राज्यातील पोलिस महासंचालकांना त्या भेटल्यात का? असा सवाल हर्षवर्धन सपकाळ यांनी उपस्थित केला आहे.

# आंदोलनकर्त्यांच्या निवारा शेड, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष; जिल्हा प्रशासनाला 'तिरडी भेट'

## ➤ जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन : डॉ. गणेश ढवळे

**बीड / प्रतिनिधी :**

बीड जिल्ह्यात महसूल, पोलिस, कृषी व ग्रामविकास यंत्रणा दाद देत नसल्याने हताश नागरिक न्यायासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाचा मार्ग स्वीकारतात. मात्र प्रशासनाकडून आठ-आठ दिवस त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

आंदोलन स्थळी साधा निवारा, पिण्याचे पाणी किंवा स्वच्छतागृह यांसारख्या मूलभूत सुविधांचा अभाव असल्याने आंदोलनकर्त्यांची मोठी गैरसोय होत आहे. वाढत्या उन्हामुळे उपोषणकर्त्यांच्या आरोग्यावर परिणाम होऊन अनुचित घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

गेल्या चार वर्षांपासून आंदोलनकर्त्यांसाठी निवारा शेड, पिण्याचे पाणी व स्वच्छतागृहे उपलब्ध करून देण्याची मागणी सातत्याने करण्यात येत आहे. तसेच लोकवर्गणीतून निवारा शेड उभारण्यास परवानगी द्यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. मात्र याकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष दिले नसल्याने सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे ( लिंबागणेशकर ) ● पान २ वर ...

### मागण्यांकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी

● जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अनेकदा नागरिक आठवडाभर किंवा पंधरा दिवस उपोषण करतात. संबंधित विभागांनी दोन दिवसांच्या आत आंदोलनकर्त्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांच्या प्रश्नांवर तोडगा काढावा, अशी मागणी करण्यात आली.



### स्वच्छतागृहांचे पुनर्बांधकाम करावे

● बीड-अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गाच्या रुंदीकरणादरम्यान नाली बांधकामासाठी अनेक सार्वजनिक स्वच्छतागृहे पाडण्यात आली. त्यामुळे शासकीय कार्यालयात येणाऱ्या नागरिकांची गैरसोय होत असून, तातडीने नवीन स्वच्छतागृहे उभारावीत, अशी मागणी करण्यात आली आहे.

### मूलभूत सुविधांची तातडीची गरज

● नगर रोड परिसरातील शासकीय कार्यालयांजवळील झाडे तोडल्याने आंदोलनकर्त्यांचा नैसर्गिक निवारा नाहीसा झाला आहे. त्यामुळे कडक उन्हात उपोषण करणाऱ्यांच्या जीविताला धोका निर्माण झाला असून, तातडीने निवारा शेड, पिण्याचे पाणी व स्वच्छतागृहांची व्यवस्था करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

**धुनकेश्वर यात्रेत रिक्षाचालक आप्पा बोडकेंच्या प्रामाणिकपणाचा आदर्श** ➤ समाजासाठी एक आदर्श उदाहरण

# प्रामाणिकपणा आजही जिवंत : हातावर पोट रिक्षा चालकाने दिले ३ लाखांचे सोने परत

**➤ वडवणी : प्रतिनिधी**

आजच्या जमान्यात ईमानदारीची जागा कचऱ्यात गेली की काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. पैसा, धन मिळवण्यासाठी राजरोसपणे खून, मारामाऱ्या होत असताना धारूर वडवणी तालुक्याच्या सीमेवरील धुनकेश्वराच्या यात्रेत एक अनोखा प्रकार घडला. अजूनही प्रामाणिकपणा जिवंत आहे याची प्रचिती आली. एका महिलेचे हरवलेले तीन लाखाचे सोने हे एका रिक्षा चालकाने प्रामाणिकपणे परत केले.



रिक्षाचालक आप्पा बोडके यांच्या

प्रामाणिकपणाचे सर्वत्र कौतुक होत आहे. वडवणी आणि धारूर तालुक्याच्या सीमेवर कुंडलिका नदीच्या काठावर अगदी डोंगर माथ्यावर धनकेश्वराचे प्राचीन आणि जागृत देवस्थान आहे. या ठिकाणी दरवर्षी श्रावण आणि चैत्र महिन्यात मोठी यात्रा भरत असते. यात्रेसाठी लाखो भाविक दर्शनासाठी येत असतात. या यात्रेला मोठ्या प्रमाणात महिला, मुले, वृद्धांची गर्दी असते. सोमवारी या ठिकाणी प्रचंड यात्रा भरली होती. उन्हाच्या तीव्र झळा असतानाही या ठिकाणी गर्दी मावत नव्हती. आणि या गर्दीतूनच अचानक एका मुलीची पिशवी हरवली गेली. पिशवीमध्ये तीन लाखाचे सोने आणि मौल्यवान वस्तू होत्या. धुनकवाड येथील सुभाष प्रकाश यादव यांची मुलगी वैष्णवी हिची गर्दीत पिशवी हरवली होती. वैष्णवी ही माहेरी गावातील धुनकेश्वर यात्रेसाठी दर्शनाला आली होती. यात्रेनिमित्त मोठ्या प्रमाणावर भाविकांच्या उसळलेल्या गर्दीत पिशवी सापडण्यासाठी धावपळ करण्यात आली. यात्रेतील प्रचंड गर्दीमुळे पिशवी परत मिळण्याची शक्यता कमी असल्याचे वाटत असतानाच एक दिलासा देणारी घटना घडली. दरम्यान, हीच पिशवी धुनकवाड येथील रिक्षाचालक आप्पा बोडके यांना सापडली. पिशवीमध्ये मौल्यवान सोनं असल्याचे त्यांच्या लक्षात आल्यानंतरही त्यांनी कोणताही मोह न बाळगता प्रामाणिकपणाचा आदर्श दाखवला. त्यांनी तत्काळ पिशवीतील माहितीच्या आधारे संबंधित मुलीचा शोध घेण्यास सुरुवात केली. काही वेळातच त्यांनी सुभाष यादव यांचा संपर्क शोधून काढला आणि पिशवी त्यांच्या स्वाधीन केली.

हरवलेली पिशवी आणि त्यातील सोन्याचे दागिने सुरक्षित परत मिळाल्याने यादव कुटुंबियांनी मोठा सुटकेचा नि :श्वास सोडला. त्यांनी आप्पा बोडके यांचे मन :पूर्वक आभार मानत त्यांच्या प्रामाणिकपणाचे कौतुक केले. या घटनेची माहिती गावात व परिसरात पसरताच नागरिकांकडून आप्पा बोडके यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. आजच्या काळात पैशाच्या मोहापायी अनेक अनैतिक प्रकार घडत असताना आप्पा बोडके यांनी दाखवलेला प्रामाणिकपणा समाजासाठी एक आदर्श उदाहरण ठरत आहे.

धुनकेश्वर यात्रेसारख्या मोठ्या धार्मिक सोहळ्यात घडलेली ही घटना प्रामाणिकपणा, विश्वास आणि मानवतेचा संदेश देणारी ठरली असून, "प्रामाणिकपणा अजूनही जिवंत आहे" हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

# ११ वर्षांपासून फरार घरफोडी आरोपी अखेर जेरबंद; माजलगाव शहर पोलिसांची कारवाई



**माजलगाव :**

माजलगाव शहर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या घरफोडी प्रकरणातील तब्बल ११ वर्षांपासून फरार असलेल्या आरोपीला अखेर पोलिसांनी जेरबंद करण्यात यश मिळवले आहे. पोलीस स्टेशन माजलगाव शहर येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक ३१/२०१५ अंतर्गत भारतीय दंड संहितेच्या कलम ४५७ व ३८० प्रमाणे दाखल गुन्ह्यातील आरोपी दगडू अभिमान गायसमुद्रे ( रा. गौतम नगर, माजलगाव, ह.मु. नित्रुड, ता. माजलगाव ) हा दीर्घकाळापासून फरार होता. ● पान २ वर ...



● २०१५ मधील घरफोडी प्रकरणातील आरोपी ११ वर्षांपासून फरार ● नित्रुड येथे लपून बसल्याची गोपनीय माहिती ● पोलिस पथकाने पाठलाग करून शिताफीने अटक ● वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई ● घरफोडी प्रकरणातील ११ वर्षांपासून फरार असलेल्या आरोपीला माजलगाव शहर पोलिसांनी गोपनीय माहितीच्या आधारे पकडले.

## आजचे राशि भविष्य

### मेष रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस गोंधळात टाकणारा असेल. तुम्हाला विनाकारण खूप धावपळ करावी लागेल, ज्यामुळे तुमचे मन अस्वस्थ होईल. काही काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल, परंतु तुम्हाला तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात संयम ठेवावा लागेल, अन्यथा समस्या उद्‌भवू शकते. जर तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात सुरू असेल तर आजचा या प्रकरणात तुमच्या बाजूने निकाल लागेल. तुम्ही तुमच्या विरोधकांवर विजय मिळवाल. राजकारणात काम करणाऱ्या लोकांना मोठे पद आणि आदर मिळू शकतो. जर कुटुंबात परस्पर मतभेद असतील तर ते सोडवले जाऊ शकतात.

### वृषभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने कमकुवत राहणार आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल. तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता, परंतु आजचा भागीदारीच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे, म्हणून आजचापासून भागीदारीचे काम सुरू करू नका. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

### मिथुन रास

➤ या राशीसाठी आजचा दिवस खूप शुभ राहणार आहे. तुम्हाला नवीन वाहन मिळू शकते. तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही शुभ समारंभात सहभागी होऊ शकता. मुलांशी तुमचा चांगला समन्वय असेल आणि तुम्ही त्यांच्या शिक्षणात त्यांना पाठिंबा द्याल. तुमच्यासाठी नवीन कामात गुंतवणूक करणे चांगले राहील. तुमच्या मनात असलेल्या समस्यांबद्दल तुम्ही वरिष्ठ सदस्यांशी बोलू शकता आणि त्यांच्याकडून तुम्हाला योग्य उपाय मिळतील. आईचा कोणताही जुना आजार पुन्हा उद्‌भवू शकतो ज्यामुळे त्रास होईल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे.

### कर्क रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस कायदेशीर बाबींमध्ये चांगला राहणार आहे. तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. कुटुंबातील लोक तुमच्या शब्दांचा आदर करतील, ज्यामुळे तुम्ही समाधानी राहाल आणि काहीतरी खास करण्याची इच्छा प्रबळ राहील. आजचा तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आनंदासाठी काही भौतिक वस्तू खरेदी करू शकता. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या प्रभावात येऊ नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

### सिंह रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस अचानक लाभदायक असेल. पण आजचा गाडी चालवताना त्यांना काळजी घ्यावी लागेल कारण दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे. व्यवसायात कोणासोबतही भागीदारीत कोणताही करार करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते, असा सल्ला दिला जातो. तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी असेल. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

### कन्या रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा गोंधळात टाकणारा असेल. मानसिक अस्वस्थतेमुळे तुम्हाला निर्णय घेण्यात अडचण येईल. परस्पर भांडणांमुळे कुटुंबातील वातावरण बिघडू शकते. तुमच्या मनात एखाद्या गोष्टीची भीती असेल, ज्यामुळे तुम्ही चिंतेत राहाल. आजचा एखाद्या स्पर्धेत यश मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद होईल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल.

### तूळ रास

➤ आजचा, तूळ राशीसाठी फायदेशीर राहील आणि आदर वाढेल. तुम्हाला वाहनाचे सुख मिळेल, जे लोक वाहन खरेदी करण्याचा विचार करत आहेत त्यांच्यासाठी आजचा दिवस या बाबतीत अनुकूल असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याला तुम्ही बोललेल्या गोष्टीबद्दल वाईट वाटू शकते, ज्यामुळे तो रागावू शकतो. तुमच्या अभ्यासाशी संबंधित काही प्रकरणे सोडवली जात आहेत असे दिसते. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो.

### वृश्चिक रास

➤ आजचा तुमच्यासाठी प्रगतीचा मार्ग मोकळा करेल. व्यवसायात नफा मिळाल्यानंतर तुम्ही आनंदी व्हाल. एखाद्याकडून ऐकलेल्या गोष्टीवरून वाद घालू नका, अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो. आर्थिक बाबींमध्ये तुम्ही मित्रांकडून सल्ला घेऊ शकता परंतु इतर कोणाच्याही प्रभावाखाली कोणताही निर्णय घेऊ नका अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

### धनु रास

➤ आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल. तुम्हाला तुमच्या विरोधकांपासून सावध राहावे लागेल. अनावश्यक अडचणीत पडणे टाळावे आणि स्वतःच्या कामात लक्ष द्यावे. जर तुम्ही दुसऱ्यांच्या बाबतीत ढवळाढवळ केली तर तुम्ही अडचणीत येऊ शकता. जर तुमच्या तब्येतीत काही बिघाड झाला असेल तर आजचा ती सुधारेल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

### मकर रास

➤ या दिवस तुमच्यासाठी गोंधळात टाकणारा असू शकतो. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला काही चांगली बातमी ऐकायला मिळू शकते. आजचा तुम्ही तुमच्या कामाच्या व्यवसायात काही बदल कराल परंतु आजचा कोणतेही धोकादायक पाऊल उचलू नका. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

### कुंभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस चांगला राहणार आहे. व्यवसायात, तुम्हाला मागील योजनांमधून चांगले फायदे मिळू शकतात, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल. जर तुमचे कोणतेही प्रलंबित काम तुम्हाला बऱ्याच काळापासून त्रास देत असेल तर तेही पूर्ण होऊ शकते. जर तुम्हाला कोणत्याही शारीरिक समस्येमुळे त्रास झाला असेल तर तुम्हाला त्यातही आराम मिळत असल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो.

### मीन रास

या राशीसाठी आजचा दिवस चैनीच्या वस्तूंमध्ये वाढ आणणारा आहे. तुम्ही तुमच्या आयुष्यात एक मोठा निर्णय घेऊ शकता आणि वरिष्ठ सदस्य तुमच्या बोलण्याने खूश होतील. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला भेटवस्तू मिळू शकते. तुमच्या पालकांच्या आशीर्वादाने तुम्ही आजचा यशाकडे वाटचाल कराल. आजचा व्यवसायात तुमची कमाई चांगली असेल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते.







# महावीर जयंतीला जन्मकल्याणक महोत्सवात कार्यक्रमांची रेलचेल; ऐरावत हत्तीवरुन थाटामाटात शोभायात्रा

धर्मतीर्थ ( प्रतिनिधी ) – कचनेरजवळ श्रीक्षेत्र धर्मतीर्थ येथे श्री वृषभ सिध्द जिन बिम्बाच्या ५१ फूट अतिविशाल प्रतिमा पंचकल्याणक प्रतिष्ठापना, महामस्तकाभिषेक महोत्सवात काल सोमवारी ( दि.३० ) ऋषभनाथ भगवंताचे जन्मकल्याणक साजरे करण्यात आले. सौधर्म इन्द्र श्री भुषण व सौ. प्रिया पाटणी यांची ऐरावतावरुन मिरवणुक काढण्यात आली. पंडुक शिलावर जाऊन ऋषभदेव बालतीर्थन्कराचा अभिषेक करण्यात आला. तसेच महावीर जयंतीचे जन्मकल्याणक विधी साजरे करण्यात आले. गणाधिपती गणधराचार्य यांचे प्रवचन झाले.

भगवंताचा अभिषेक व विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल होती. पहाटेपासून रात्रीपर्यंत सातत्याने कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यात मोठ्या संख्येने भाविक सहभागी झाले.

काल ऐरावत हत्तीवरुन थाटामाटात निघालेल्या शोभायात्रेने लक्ष वेधून घेतले. भाविकांनी परमपूज्य जगदगुरु गणाधिपती, गणधराचार्य श्री कुंथुसागरजी गुरुदेव यांच्या पवित्र सान्निध्यात व क्रांतिकारी राष्ट्रसंत दिगंबर जैनाचार्य श्री गुप्तीनंदीजी गुरुदेव यांचे दर्शन, आशीर्वाद घेतले. काल महोत्सवाचा तिसरा दिवस होता. आलेल्या सर्व भाविकांचे स्वागत पंचकल्याणक प्रतिष्ठापना महोत्सव समितीचे अध्यक्ष श्री संजय पापडीवाल व कार्याध्यक्ष श्री चंद्रशेखर पाटणी यांनी केले. महामंत्री पवनकुमार पापडीवाल यांच्यासह गौरवाध्यक्ष जितेंद्र पापलकर, स्वागताध्यक्ष जिनेंद्र बाकलीवाल, प्रमोद जैन, महावीर पाटणी, कोषाध्यक्ष राजेंद्र पाटणी, मार्गदर्शक गुलाबचंद कासलीवाल, जालनापुरकर, जिंतुरकर व अनेक मान्यवर, सहकारी उपस्थित होते.

या महोत्सवात आचार्य श्री तीर्थनंदीजी, प्रज्ञाश्रमण गणनायक आचार्य श्री सुयशगुप्तजी, आचार्य श्री श्रुतधरनंदीजी, गणिनी आर्यिका क्षमाश्री माताजी यांची विशेष ससंघ उपस्थिती लाभली आहे. त्यांनीही मार्गदर्शन केले. आलेल्या सर्व भाविकांनी स्वादिष्ट भोजनप्रसाद घेतला. काल ( दि.३० ) जन्मकल्याणक विधींना पहाटे ५.३० वाजता उत्साहात सुरुवात झाली. सौधर्म इंद्र व मान्यवरांची ऐरावत हत्तीवरुन थाटामाटात शोभायात्रा काढण्यात आली. बँडच्या तालावर भाविकांनी नृत्याचा आनंद लुटला. त्यानंतर आचार्य संघाचे मंगल प्रवचन व राज्याभिषेक सोहळा उत्साहात साजरा झाला.

१००८ कलशांमधून अभिषेक करण्यात आला. दुपारी गणाधराचार्यांचे मंगल पूजन, प्रवचन झाले. रात्री सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. जिनेंद्र, सौ. हीरामणी बाकलीवाल परिवार ( पुणे ) यांनी ५१ फूट मूर्तीची वेदी निर्माण केली आहे. त्यांच्या हस्ते वेदीची पुजा करण्यात आली. भगवंताचे माता पिता बनण्याचा मान श्री राजेश व सौ. राखी जैन ब्यावर ( पुणे ) यांना मिळाला आहे. धर्मतीर्थ येथे सध्या विराजमान सर्व साधू संतांचा आहारदान देण्याचे सौभाग्य श्री जितेन्द्र बाकलीवाल परिवार ( पुणे ) यांना प्राप्त झाले.

या महोत्सवात इंद्र – इंद्राणी यांचे अमूल्य योगदान लाभले आहे. श्री हेमंत व सौ. विद्या जैन, श्री संदीप व सौ. मनिषा पाटणी, श्री अशोक व सौ. शशिकला ठोळे, श्री माणिकचंद व सौ. वैशाली गंगवाल, श्री प्रवीण व सौ. सविता साहूजी, श्री मनोज व सौ. मंजुषा पांडे, श्री संजय व सौ. सीमा खबडे यांनी इंद्र – इंद्राणी यांच्या चोख भूमिका बजावल्या आहेत. तसेच भोजनदाता श्री सुबोध जैन परिवाराने भगवंताच्या चरणी आपली सेवा अर्पण केली आहे. देशभरातील अनेक दिगंबर जैन परिवारांनी तन, मन धनाने योगदान दिले आहे.





## आज होणार राज्याभिषेक

आज मंगळवारी ( दि.३१ ) राज्याभिषेक व तपकल्याणक सोहळा होणार आहे. पहाटे ५.३० वाजता यज्ञशाळेत अभिषेक करण्यात येईल. शांतिहवन व जप केला जाईल. सकाळी ७ वाजता शांतिधारा आणि जन्मकल्याणक पूजाअर्चा केली जाणार आहे. ८ वाजता आचार्य संघाचे मंगल प्रवचन होईल. ९ वाजता राजदरबारात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. राज्याभिषेक, नृत्याचा कार्यक्रम होणार आहे. दुपारी ४ वाजता गणाधराचार्य यांचे पूजन, प्रवचन होईल. संध्याकाळी ४.३० वाजता विविध धार्मिक कार्यक्रम झाल्यानंतर भगवानाचा दीक्षाविधी संस्कार, आरती व रात्री ८ वाजता सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले जाणार आहेत.

## स्वादिष्ट भोजनप्रसादाने सर्वांना समाधान

● दररोज येथे येणाऱ्या भाविकांची सकाळच्या चहा नाश्त्यापासून सायंकाळच्या भोजनाची उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे. श्री आर.आर. पहाडे, सुनील कासलीवाल, दिलीप ठोळे व संजय चूडीवाल हे भोजन व्यवस्था समितीच्या माध्यमातून चोख व्यवस्था सांभाळत आहेत. मध्यप्रदेशातील रतलाम येथील जय मेवाड केटरर्सचे
६५ जण तर सागर येथील २५ जणांचा चमू आला असून हे ९० जण शेकडो भाविकांसाठी स्वादिष्ट भोजनप्रसाद तयार करतात. गॅस अभावी लाकूड, कोळश्याच्या चुलीवर स्वयंपाक करण्यात येतो. मधुकांत जोशी, जगदीश पुरोहित, विष्णू व्यास, बालकिशन ओझा, रमेश महाराज यांच्या नेतृत्वाखाली ही व्यवस्था सांभाळली जात आहे. या स्वादिष्ट भोजनप्रसादाने तृप्त होऊन सर्वजण समाधान व्यक्त करीत आहेत.

# बीड तालुक्यातील हिवरापहाडी येथे वीज पडून बैलाचा मृत्यू

**शेतकऱ्याचे मोठे नुकसान**





➤ **बीड : अमोल जाधव**

बीड तालुक्यातील हिवरापहाडी गावात आज दुपारच्या सुमारास अचानक झालेल्या वादळी पावसात वीज पडून अर्जुन चंद्रसेन घुगे या शेतकऱ्याच्या बैलाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. या घटनेमुळे संबंधित शेतकऱ्यावर मोठे आर्थिक संकट ओढवले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शेतकरी घुगे हे आपल्या रानातील ज्वारी चा कडबा घरी घेऊन जाण्यासाठी आपला बैल शेतात बांधून ठेवला होता. यावेळी अचानक वातावरणात बदल होऊन जोरदार वारे आणि विजांच्या कडकडाटासह पाऊस सुरू झाला. त्याच दरम्यान वीज थेट बैलावर पडल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला.

घटनेनंतर गावकऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले आहे. बैल हा शेतीसाठी अत्यंत महत्त्वाचा घटक असल्याने या नुकसानीचा परिणाम शेतकऱ्याच्या दैनंदिन कामकाजावर होणार आहे.

दरम्यान, संबंधित शेतकऱ्याला शासनाकडून आर्थिक मदत मिळावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. स्थानिक प्रशासनाने पंचनामा करून नुकसानभरपाई देण्याची प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# विहामांडवा येथे भगवान महावीर जयंती उत्साहात साजरा

**विहामांडवा : प्रतिनिधी**

विहामांडवा येथे भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. पैठण तालुक्यातील विहामांडवा येथील सकल जैन समाजातर्फे भगवान महावीर यांची ३० मार्च रोजी भव्य मिरवणूक काढण्यात आली. ही मिरवणूक जैन मंदिर–मेन मार्केट–सभाजी चौक महामार्ग ही मिरवणूक काढण्यात आली. यात संदीप पहाडे व संतोष पहाडे यांच्या परिवाराकडून अन्नदान करण्यात आला. यावेळी पारंपरिक वेशभूषा, झेंडे, तसेच धार्मिक घोषणांनी परिसर भक्तिमय झाला होता.

विविध ठिकाणी रांगोळ्या काढून आणि स्वागत कमानी उभारून शोभायात्रेचे स्वागत करण्यात आले. मिरवणुकीदरम्यान लहाण मुलांचे नृत्य सादर केले. यावेळी जिल्हा परिषद सदस्य नितीन तांबे, पंचायत समिती सदस्य अतुल पन्हाळकर, माजी सरपंच लहु पाटील डुकरे, मुकेश सेठ काला, सरपंच बप्पासाहेब येळे, माजी सरपंच अफसर भाई शेख, ग्रा. पं. सदस्य सुनिल डुकरे, पांडुरंग पवार, विनोद निंबाळकर, दिपक गाभुड, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष संजय गाभुड, माजी अध्यक्ष राजेंद्र पन्हाळकर यांनी भगवान महावीर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून समस्त समाज बांधवांना जन्म कल्याणाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी सोहळ्यासाठी उपनिरीक्षक सचिन पंडीत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.



यावेळी दिपक कासलीवाल, सुधीर पहाडे, पवन खोबरे, संदेश अब्बड, पियुष छाजेड, धिरज कासलीवाल, पलश पहाडे, वैभव काला, विपुल सिसोदिया, आकाश छाजेड, यश छाजेड, आकाश पहाडे सुशील सुराणा, आकाश चुडीवाल, विपिन दुग्गड, ललित दुग्गड, पंकज कांकरीया, अमित पहाडे, नितिन कासलीवाल, महावीर काला, अजित पहाडे, सुनिल संकलेचा, राकेश बोरा, मुकेश कांकरिया, पलाश पांडे, आकाश चुडीवाल, दिलीप कासलीवाल आदी उपस्थित होते.

## आंदोलनकर्त्यांच्या निवारा शेड, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष; जिल्हा प्रशासनाला 'तिरडी भेट'

● पान १ वरून...यांच्या नेतृत्वाखाली "जिल्हा प्रशासनाला तिरडी भेट" हे लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले.

यावेळी जिल्हाधिकारीमार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व पालकमंत्री यांना निवेदन सादर करण्यात आले. आंदोलनात माहिती आधिकार कार्यकर्ते शेख युनुस, पांडुरंग हराळे, शेख मुबीन, बाळासाहेब मोरे पाटील ( शिवशक्ती भिमशक्ति प्रदेशाध्यक्ष )बाळासाहेब, सामाजिक कार्यकर्ते बाजीराव ढाकणे, रामधन जमाले( जिल्हाध्यक्ष इंटक ), माजी सैनिक अशोक येडे( जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी ), सादेक सय्यद ( शहराध्यक्ष आम आदमी पार्टी ), भिमराव कुटे ( बामसेफ युवा जिल्हाध्यक्ष ), किष्किंधा पांचाळ ( अध्यक्ष विश्व कल्याण महिला सेवा भावी संस्था ), बबिता शिंदे ( जिल्हाध्यक्ष तृप्ती देसाई ब्रिगेड ), सीताबाई भोसले ( रिपाई महिला आघाडी जिल्हाध्यक्ष ), हनुमान घोडके, भिमराव पायाळ आदी सहभागी झाले होते.

## ११ वर्षांपासून फरार घरफोडी आरोपी अखेर जेरबंद; माजलगाव शहर पोलिसांची कारवाई

● पान १ वरून...दि. ३० मार्च २०२६ रोजी आरोपी नित्रुड येथे असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांच्या मार्गदर्शनाखाली पथक तयार करण्यात आले. या पथकात पोलीस उपनिरीक्षक संदीप राठोड, पोलीस हवालदार अस्लम शेख, पोलीस शिपाई सुनिल गवळी व महेश चव्हाण यांचा समावेश होता. पथक नित्रुड येथे पोहोचताच आरोपीने पोलिसांना पाहून घरातून पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी तत्परता दाखवत त्याचा पाठलाग करून शिताफीने त्याला ताब्यात घेतले आणि संबंधित गुन्ह्यात अटक केली. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके ( अंबाजोगाई ) व उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके ( माजलगाव ) यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

सांज दैनिक बीड वास्तव

सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड –४३११२२ ( महाराष्ट्र ) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ ( महाराष्ट्र ) येथून प्रसिद्ध केले. **संपादक – जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक –अरविंद ओव्हाळ** ( या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही ) ( वाद–विवाद बीड न्याय कक्षेत ) मो. 9022952922

विशेष

## बीड न.प. कर्मचारी शिलाबाई शिंतोडे सेवानिवृत्त

### ३९ वर्षांच्या प्रामाणिक सेवेचा नगरपरिषद कडून सन्मान



➤ **बीड** : बीड नगरपालिकेत तब्बल ३९ वर्षे प्रामाणिकपणे सेवा बजावलेल्या शिलाबाई मारुती शिंतोडे या कर्मचारी ३१ मार्च २०२६ रोजी सेवानिवृत्त झाल्या. त्यांच्या प्रदीर्घ व निष्ठावान सेवेला मानाचा मुजरा देत नगरपालिकेत त्यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी उपमुख्याधिकारी उमेश दुधाळ यांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन शिलाबाई शिंतोडे यांचा सन्मान करण्यात आला. तसेच सम्राट कदम यांच्यासह कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. शिलाबाई शिंतोडे यांनी नगरपरिषदेतील विविध विभागांमध्ये काम करताना प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा आणि जबाबदारीची जाणीव कायम ठेवली. त्यांच्या सेवेमुळे त्या सहकाऱ्यांमध्ये तसेच नागरिकांमध्ये सर्वपरिचित आणि आदरणीय बनल्या होत्या. कार्यक्रमात उपस्थितांनी त्यांच्या कार्याचा गौरव करत पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी नगरपालिका उपमुख्यधिकारी उमेश दुधाळ, सम्राट कदम साहेब, रोहिटे साहेब, सिद्धांत वडमारे अक्षय वडमारे कपिल इनकर व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

# नर देहाला पवित्रता भजनाने येते, सप्ताह आनंदासाठी असतो - सोपान महाराज हिंगोलीकर

### ➤ जगाचा राजा पांडुरंग नामस्मरण हाच खरा आनंदाचा मार्ग





➤ **आष्टी : प्रतिनिधी**
"नर देहाला पवित्रता भजनाने येते, सप्ताह आनंदासाठी असतो."
श्री क्षेत्र गणेशगड व नागनाथ देवस्थान, वेताळवाडी येथील १४ व्या नारळी सप्ताहात ह.भ.प. सोपान महाराज हिंगोलीकर यांचे कीर्तन संपन्न. यावेळी त्यांनी महंत काशिनाथ महाराजांच्या देवरूपावर भाष्य करताना अंधश्रद्धेपासून दूर राहून सच्च्या संतांच्या मार्गाने जाण्याचा संदेश दिला. जगाचा राजा पांडुरंग असून नामस्मरण हाच खरा आनंदाचा मार्ग असल्याचे सांगितले. भक्तिमय वातावरणात हा सप्ताह उत्साहात साजरा होत आहे.

आष्टी तालुक्यातील वेताळवाडी येथे श्री क्षेत्र गणेशगड व नागनाथ देवस्थान, वेताळवाडी यांचा १४ वा नारळी सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. ह.भ.प. काशिनाथ महाराज यांच्या पवित्र मार्गदर्शनाखाली या सप्ताहाच्या पाचव्या दिवशी, दिनांक ३० मार्च २०२६ रोजी संध्याकाळी ९ ते ११ या वेळेत कीर्तनाची सेवा ह.भ.प. सोपान महाराज हिंगोलीकर यांची संपन्न झाली.

यावेळी कीर्तनात सोपान महाराज यांनी सांगितले की, महंत काशिनाथ महाराज हे देवाचे रूप आहेत. त्यांना जपा, खरे संत हेच आहेत. लोक कोणाच्याही पाया पडतात आणि अंधश्रद्धेला बळी पडतात. या पावन भूमीत संत भगवान बाबा संत वामनभाऊ होऊन गेले. त्यांना लोक अजूनही मानतात. मी गहीनाथ गड येथे दर्शनाला गेलो असता, अजूनही तिथे संत वामनभाऊ यांनी वापरलेल्या जुन्या वस्तू – पातेले, चमचे, घोड्याचा टांगा – लोकांना पाहण्यासाठी ठेवल्या आहेत. भूक लागणे, मृत्यू येणे या क्रिया सर्वांना आहेत. मृत्यूची भीती सर्वांना आहे, पण मृत्यूच्या भीतीने आपण देवाचे पाय धरतो. देव त्याला तारी, त्याला कोण मारी? काळाला दगडही मारू नका, त्याला आवाजही देऊ नका, फक्त देवाचे स्मरण करा.

सरपंच गावचा राजा, जिल्हा परिषद सदस्य गटाचा राजा, आमदार तालुक्याचा राजा, खासदार जिल्ह्याचा, राष्ट्रपती देशाचा राजा आहे. तर जगाचा राजा पांडुरंग आहे. वैकुंठ टाईप करणे सोपे आहे, परंतु वैकुंठ होणे अवघड आहे. तुझा नामाचा महिमा सप्ताह फक्त आनंदासाठी आहे.

वेताळवाडी ग्रामस्थ व येथील युवकांनी अतिशय चांगल्या प्रकारे पार्किंगची सोय, पाण्याची सोय, जेवणाची सोय अतिशय नियोजनपूर्वक केली आहे. वेताळवाडी ग्रामपंचायतचे कौतुक करावे तेवढे कमी आहे. सप्ताह प्रसंगी नामांकित प्रकाश महाराज साठे यांची भागवत कथा सुरू आहे, त्यामुळे सर्वांनी या कथेचा आनंद घ्यावे, असे आवाहन सोपान महाराज हिंगोलीकर यांनी केले.
सोपान महाराज म्हणाले, "पत्रकार समीर शेख आपल्या सर्व सप्ताहाची बातमी करतात, त्यांचेही मनापासून धन्यवाद." तसेच मंडप डेकोरेशन, एलईडी स्क्रीन, मृदंगाचार्य, टाळकरी, पेटीवादक, विणेकरी व कीर्तनासाठी आलेल्या सर्व भाविकांचे आभार मानले.

या प्रसंगी सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि धार्मिक क्षेत्रातील मान्यवर तसेच भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. भाविकांनी मोठ्या प्रमाणात उपस्थित राहून कीर्तनाचा लाभ घेतला. या निमित्ताने देवस्थान परिसर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाला. या नारळी सप्ताहानिमित्त विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, भाविकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला आहे. यावेळी वेताळवाडी, किन्ही, भवरवाडी येथील युवक, माता, पुरुष तसेच ग्रामस्थांनी गावचा नारळी सप्ताह चांगला व्हावा यासाठी मेहनत घेतली आहे. या सप्ताहामध्ये सर्व जाती–धर्माचे लोक एकत्र येऊन कार्यरत आहेत.

# प्रभू श्रीरामांच्या तत्त्वावर पंतप्रधान मोदी देशाचा कारभार - नवनाथ बन

### ➤ सरकारचे योजना सर्वसामान्यापर्यंत पोहचवणे ही आपली जबाबदारी - आ.सुरेश धस ➤ आष्टी व कडा मंडळाच्यावतीने पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान उत्साहात


➤ **आष्टी : प्रतिनिधी :**
कडा येथे आष्टी व कडा मंडळाच्या वतीने आयोजित 'पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान 2026' या महत्त्वपूर्ण उपक्रमाचा सांगता समारंभ उत्साहात पार पडला. या वेळी भाजपचे महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ते तथा मुंबई महानगरपालिकेचे सदस्य नवनाथ बन यांनी प्रमुख मार्गदर्शन करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाचा गौरव करत, प्रभू श्रीरामचंद्रांच्या तत्त्वांवर आधारित शासनपद्धती देशात राबवली जात असल्याचे प्रतिपादन केले.
नवनाथ बन आपल्या विस्तृत भाषणात म्हणाले की, प्रभू श्रीरामचंद्र हे राजघराण्यात जन्मले तरी त्यांनी जनतेच्या कल्याणासाठी वनवास स्वीकारला आणि त्या कठीण परिस्थितीतही त्यांनी आदर्श, कर्तव्यनिष्ठा आणि संयम यांचे पालन केले. त्यामुळेच त्यांना 'मर्यादा पुरुषोत्तम' ही उपाधी प्राप्त झाली. त्याचप्रमाणे भारतीय जनता पार्टी नेही अनेक वर्षे सत्तेबाहेर राहून संघर्षाचा काळ अनुभवला. या





'वनवासातून' बाहेर पडलेले प्रभावी नेतृत्व म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी असून त्यांनी देशाला स्थैर्य, विकास आणि सुरक्षिततेची नवी दिशा दिली आहे.
ते पुढे म्हणाले की, भारतीय जनता पार्टीच्या विचारांची पायाभरणी करताना अनेक पिढ्यांनी त्याग केला. अटल बिहारी वाजपेयी, लाल कृष्ण अडवाणी, मुरली मनोहर जोशी, यांसारख्या ज्येष्ठ नेत्यांनी पक्षाची विचारधारा देशभर पोहोचवली. आज त्याच विचारांच्या बळावर पक्ष देशातील सर्वात मोठा राजकीय पक्ष बनला आहे.
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाने जागतिक स्तरावर आपले स्थान अधिक बळकट केले आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताची प्रतिमा उंचावली असून अनेक देश भारताकडे आदराने पाहत आहेत. गरीब, वंचित, शोषित, दलित व आदिवासी घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध योजना राबवण्यात आल्या आहेत. घरकुल, आरोग्यसेवा, पायाभूत सुविधा, डिजिटल सेवा या क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर प्रगती झाली असून सामान्य नागरिकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडत आहेत, असेही त्यांनी स्पष्ट केले.
महाराष्ट्रातील राजकारणावर भाष्य करताना त्यांनी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात विकासकामांना वेग आला असून जनतेने त्यांना पुन्हा एकदा संधी दिली आहे. कार्यकर्त्यांनी केंद्र व राज्य सरकारच्या योजना तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी अधिक सक्रिय राहण्याचे आवाहनही त्यांनी केले.
या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आष्टी मतदारसंघाचे आमदार सुरेश धस होते. तसेच व्यासपीठावर भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश सोशल मीडिया सेलचे प्रदेशाध्यक्ष प्रकाशजी गाडे, भाजप सोशल मीडिया सेल प्रदेश कार्यकारिणी सदस्य दत्ताजी महाजन, हिंदुत्ववादी कार्यकर्ते व ज्येष्ठ इतिहास अभ्यासक पवन मोगरेकर, आष्टी विधानसभा प्रमुख गणेश नाना शिंदे, सामाजिक कार्यकर्ते माऊली जरांगे, कडा मंडळ अध्यक्ष अनिल ढोबळे, आष्टी मंडळ अध्यक्ष रमेश गावडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.
अध्यक्षीय समारोपात आमदार सुरेश धस यांनी सांगितले की, २०१४ ते २०१९ या काळात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या विकासकामांमुळेच जनतेने युतीला मोठा पाठिंबा दिला होता. त्यांच्या कार्याची हीच खरी पावती होती. मात्र त्यानंतर उद्धव ठाकरे यांनी वेगळी राजकीय भूमिका घेतल्यामुळे परिस्थिती बदलली. तरीही देवेंद्र फडणवीस यांनी विरोधी पक्षात राहूनही आपले नेतृत्व सिद्ध केले आणि 'मी पुन्हा येईन' या शब्दाला खरे ठरवत पुन्हा सत्तेत येऊन कामगिरी केली. सरकारने देखील अनेक योजना राबविल्या असून सरकारचे योजना सर्वसामान्यापर्यंत पोहचवणे ही आपली जबाबदारी असल्याचे प्रतिपादन आ.सुरेश धस असे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमादरम्यान उपस्थित कार्यकर्त्यांचा उत्साह, शिस्तबद्धता आणि संघटनाबद्दलची निष्ठा विशेषत्वाने जाणवली. या सहा दिवसीय प्रशिक्षण महाअभियानात तालुक्यातील पदाधिकारी, बूथप्रमुख, शक्तिकेंद्रप्रमुख, महिला पदाधिकारी, युवा कार्यकर्ते आणि विविध आघाड्यांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने करण्यात आले होते. शेवटी आयोजकांच्या वतीने सर्व मान्यवरांचे आभार मानण्यात आले आणि राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## महा जम्बो शब्दकोडे



### आडवी विधाने

१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दुःख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

### उभी विधाने

१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी (हिंदी)
९. 'शुक्रतारा' हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळलाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंतःकरण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - ** अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंतःकरण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

### महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | सं | त | का | ने | ट | क | र | | धु | | टो | क | दा | र |
| सा | ग | र | | म | | स | ई | प | रां | ज | पे | | दा | स |
| | न | | द | | वा | र | स | | डे | रा | | लू | | वं |
| अ | म | री | श | पु | री | | | म | | सं | क | ट | | ती |
| ना | त | | र | त | | चौ | क | शी | | ध | | मा | घ | |
| थ | | र | थ | | मा | का | | द | र | | खा | र | | क |
| | मो | द | | क | ल | र | व | | वा | ट | प | | त | म |
| मे | ह | न | त | | व | | जी | व | न | | र | ख | वा | ला |
| ह | र | | | क | ण | ख | र | | गी | त | | रू | | |
| बू | | स | व | ड | | प | | उ | | ग | र | ज | वं | त |
| ब | र | खा | स्त | | रा | | उ | दा | ह | र | ण | | श | र |
| | त्न | | रा | ज | धा | नी | | स | ल | | जी | व | | बे |
| न | मा | ज | | न्म | | ल | ग्न | | का | | त | र | बे | ज |
| क | ला | का | र | | ना | म | | भी | | अ | | पा | | |
| ली | | त | ग | म | ग | | स | म | ज | दा | र | | शो | ध |

# सातत्यपूर्ण, परिश्रमाच्या बळावर ग्रामीण भागातून उगवत आहेत यशस्वी तारे

## आ. प्रकाशदादा सोळंके यांनी केला विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वाचा गौरव; दिली पाठीवर थाप!

➤ **अरविंद ओव्हाळ : प्रतिनिधी**
तालुक्यातील कोथरुळ येथे आयोजित शिव संस्कार गुरुकुल व नवोदय क्लासेसच्या वतीने काल दि ३० मार्च रोजी नवोदय, सैनिक शाळा, स्कॉलरशिप, NMMS आदी स्पर्धात्मक परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार सोहळा उत्साहात पार पडला.

या प्रेरणादायी कार्यक्रमास उपस्थिताना मार्गदर्शन करताना माजलगाव मतदार संघाचे आ प्रकाशदादा सोळंके म्हणाले की, ग्रामीण भागातील विद्यार्थी केवळ नवोदयपुरते मर्यादित न राहता विविध स्पर्धात्मक परीक्षांमध्येही उत्तुंग भरारी घेत असल्याचे या कार्यक्रमातून पुन्हा एकदा अधोरेखित झाले. या यशामागे गुरुकुलाचे संचालक व त्यांचे सातत्यपूर्ण, परिश्रमपूर्वक मार्गदर्शन हेच खरे बळ असल्याचे स्पष्ट झाले.
याच पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना अधिक प्रोत्साहन मिळावे व ज्ञानाची दारे अधिक व्यापक व्हावीत यासाठी गावात वाचनालय इमारतीसाठी तब्बल १५ लाख रुपयांचा निधी देण्याची घोषणा यावेळी करण्यात आली, ही विशेष बाब ठरली.

गुरुकुलाचे संचालक, शिक्षकवृंद व सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन! ग्रामीण भागातून असेच तेजस्वी विद्यार्थी घडत राहोत, हीच सदिच्छा. अशी भावना आ प्रकाशदादा सोळंके यांनी या वेळी बोलताना व्यक्त केली या वेळी पालक व गावातील नागरीक मोठया प्रमाणात उपस्थित होते.



## विशेष



## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी अभिषेक टाकणखार

➤ **माजलगाव : प्रतिनिधी**
विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शहरातील इंदिरा नगर येथे दिनांक २८ रोजी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर समाज बांधवांची बैठक उत्साहात पार पडली. ही बैठक भिमराव टाकणखार व प्रकाश उजगरे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती.
बैठकीत खेळीमेळीच्या वातावरणात जयंती उत्सव समितीची कार्यकारिणी सर्वानुमते जाहीर करण्यात आली. त्यामध्ये अध्यक्षपदी अभिषेक टाकणखार, उपाध्यक्षपदी आदित्य झोडगे, सचिवपदी रमेश बल्लाळ तर कोषाध्यक्षपदी रोहित टाकणखार यांची निवड करण्यात आली.
यावेळी मार्गदर्शक मंडळात डी. के. टाकणखार, सुधाकर जावळे, महादू टाकणखार, सुशिल शिंदे, जितेंद्र तोडके, राजेश झोडगे, राजेंद्र जावळे, प्रवीण सोनपसारे, विलास भाग्यवंत, अविनाश टाकणखार, अश्विन टाकणखार, आकाश घुगे, अजय जावळे, बाबासाहेब दाभाडे, शशिकांत घनघाव, बाळू जावळे आदींची निवड करण्यात आली.
तसेच या बैठकीस चेतन फंदे, युवराज जावळे, दशरथ साळवे, मधुकर तोडके, विनोद टाकणखार, चंद्रकांत लोंढे, धम्मा साळवे, संगपाल साळवे, त्रिशरण टाकणखार, अजय शिरसट, रत्नदीप टाकणखार, भारत टाकणखार, करण मिसाळ, महिवाल घाडगे, देवील साळवे, सागर उजगरे, सिद्धांत उजगरे, स्वप्निल टाकणखार, पप्पू डोंगरे, अजय जाधव, प्रशांत टाकणखार, प्रज्वल गायकवाड, संकेत गायकवाड, राजतनय शिंदे, आनंद जावळे, सलमान पटेल, शंभू साळवे, कचरू खरात, राणू साळवे आदींची उपस्थिती होती.
जयंती उत्सव मोठ्या उत्साहात आणि शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्याचा निर्धार समितीच्या वतीने यावेळी व्यक्त करण्यात आला.



## कृषीभूषण अजय जाधव यांना राष्ट्रीय 'जल योद्धा' पुरस्कार; कन्नड तालुक्याचा गौरव

➤ **कन्नड** : तालुक्यातील खेडा येथील प्रगतिशील शेतकरी व कृषीभूषण अजय जाधव यांना बंगलोर येथील आर्ट ऑफ लिविंग इंटरनॅशनल सेंटरमध्ये जागतिक कीर्तीचे आध्यात्मिक गुरु श्री श्री रविशंकर यांच्या हस्ते राष्ट्रीय स्तरावरील 'जल योद्धा' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या सन्मानामुळे कन्नड तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.
हा पुरस्कार नीती आयोग (भारत सरकार) यांच्या सहयोगाने आर्ट ऑफ लिविंग फाउंडेशनसह जलशक्ती मंत्रालय, ग्रामीण विकास मंत्रालय, राष्ट्रीय शहरी विकास संस्था, इस्रायल व फिनलँड दूतावास, आयआयटी रुरकी, व्हील्स ग्लोबल फाउंडेशन, असोमॅच, भारतीय नदी परिषद व सरकारिटेल डॉट कॉम या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने प्रदान करण्यात आला.
'पाणी साठवणे नव्हे, तर पाणी जमिनीत जिवंत ठेवणे' हा विचार अजय जाधव यांनी आपल्या शेतीत नैसर्गिक शेतीच्या माध्यमातून शाश्वत जलसंधारण करण्यावर भर दिला आहे. त्यांच्या मते, पारंपरिक जलसंधारण अनेकदा तात्पुरते ठरते; मात्र सेंद्रिय शेतीत माती स्पंजसारखी बनून पाणी दीर्घकाळ टिकवून ठेवते आणि भूजल पातळी नैसर्गिकरित्या वाढते.
प्रयोगशील शेती आणि जनजागृतीचा ठसा नैसर्गिक शेतीचा प्रसार, शेतकऱ्यांना प्रशिक्षण, तसेच जलसंधारणाबाबत जनजागृती या क्षेत्रात त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांची या प्रतिष्ठित पुरस्कारासाठी निवड करण्यात आली .अभिनंदनाचा वर्षाव या उल्लेखनीय यशाबद्दल कन्नड तालुक्यातील शेतकरी, नागरिक व शेतीप्रेमींकडून अजय जाधव यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. एकूणच, अजय जाधव यांच्या कार्यामुळे शाश्वत शेती व जलसंवर्धनाचा नवा आदर्श उभा राहत असून इतर शेतकऱ्यांसाठी ते प्रेरणास्थान ठरत आहेत.



## कन्नड सोसायटीवर परिवर्तन पॅनलचा झेंडा; १३ पैकी ८ जागांवर दणदणीत विजय

➤ **कन्नड** : कन्नड येथील विविध कार्यकारी सोसायटीच्या अत्यंत चुरशीच्या निवडणुकीत परिवर्तन शेतकरी कृषी विकास पॅनलने दमदार कामगिरी करत १३ पैकी तब्बल ८ जागांवर विजय मिळवत सत्ता काबीज केली. तर बळीराजा कृषी विकास पॅनलचे ५ उमेदवार विजयी झाले. ही निवडणूक २०२५ ते २०३० या कालावधीसाठी घेण्यात आली होती .निवडणुकीत मतदारांनी परिवर्तन पॅनलवर विश्वास दाखवत स्पष्ट बहुमत दिल्याने सोसायटीच्या कारभारात बदलाची अपेक्षा व्यक्त केली जात आहे .विजयी उमेदवार पुढीलप्रमाणे : सर्वसाधारण मतदारसंघ :अ. समद शे. चाँद, एकनाथ रामराव जाधव, रामनाथ नामदेव जाधव, उद्धव भिकनराव पवार, गोविंद शामराव मैराळ, नामदेव कारभारी शिरसे, सै. करीम सै. अहमद महिला मतदारसंघ : पुष्पाबाई सोमिनाथ थोरात, स्वाती उद्धव पवार विमुक्त जाती / भटक्या जमाती : सुरेश मारगु सुरे (बिनविरोध) इतर मागासवर्गीय : बाबुलाल कचरू गोरे अनुसूचित जाती / जमाती : भगवान शिवराम निकाळजे या निवडणुकीचे निर्णय अधिकारी म्हणून सुनिल कासतोडे यांनी जबाबदारी पार पाडली. एकूणच, परिवर्तन पॅनलच्या विजयामुळे कन्नड सोसायटीच्या भविष्यात नव्या धोरणांची आणि विकासाच्या नव्या दिशेची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## सादोळा गावाचा अभिमान: डॉ. भारत अंकुश सोळंके यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची डॉक्टरेट

➤ **माजलगाव : प्रतिनिधी**
सादोळा गावाचे भूषण असलेले डॉ. भारत अंकुश सोळंके यांना सावित्रीबाई फुले पुणे युनिव्हर्सिटी यांच्या वतीने डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांच्या संशोधन प्रबंधाला विद्यापीठाची मान्यता मिळाल्याने त्यांना हा मानाचा सन्मान प्राप्त झाला असून सादोळा गावासह परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

डॉ. सोळंके यांनी आपल्या जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या बळावर हे यश संपादन केले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे सादोळा गावाचे नाव उज्ज्वल झाले असून तरुण पिढीसमोर एक प्रेरणादायी आदर्श उभा राहिला आहे. त्यांच्या यशामुळे शिक्षण क्षेत्रात पुढे जाण्यासाठी नव्या पिढीला प्रेरणा मिळत आहे.

या गौरवाच्या प्रसंगी पुणे येथे विविध मान्यवर उपस्थित होते. यामध्ये ॲड. सुदर्शन साळुंके, श्रीमती करुणा सुदर्शन साळुंके, धर्मराज सोळंके, प्रशांत सोळंके, श्रीराम सोळंके, प्रवीण सोळंके, हर्षवर्धन (दामू) येरंडे, अनिल सोळंके आणि विशाल सोळंके यांचा समावेश होता. उपस्थित मान्यवरांनी डॉ. सोळंके यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

डॉ. भारत अंकुश सोळंके यांचे हे यश सादोळा गावासाठी अभिमानाची बाब ठरली असून भविष्यातही ते समाजासाठी प्रेरणादायी कार्य करत राहतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.



### महत्वाचे ठळक मुद्दे

● डॉ. भारत अंकुश सोळंके यांना डॉक्टरेट पदवी प्रदान ● सावित्रीबाई फुले पुणे युनिव्हर्सिटी कडून प्रबंधाला मान्यता ● सादोळा गावासह परिसरात आनंदाचे वातावरण ● जिद्द, मेहनत आणि चिकाटीमुळे यश संपादन ● तरुणांसाठी प्रेरणादायी आदर्श निर्माण ● पुण्यात मान्यवरांच्या उपस्थितीत गौरव ● सादोळा गावातील तरुण संशोधकाला डॉक्टरेट ● मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर मोठे शैक्षणिक यश ● गावासह परिसरात अभिमानाचे वातावरण



## माजलगावात सफाई कामगार महिलांसाठी प्रबोधन कार्यक्रम

➤ मासिक पाळी, वैयक्तिक स्वचछतेवर मार्गदर्शन


➤ **माजलगाव : प्रतिनिधी**
येथील नगरपरिषद कार्यालयात 'द लास्ट टूथ फाउंडेशन' तर्फे सफाई कामगार महिलांसाठी 'मासिक पाळी आणि वैयक्तिक स्वच्छता व्यवस्थापन' या विषयावर विशेष प्रबोधन कार्यक्रम पार पडला.

यावेळी ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. योगिता भगत यांनी महिलांना मार्गदर्शन करताना सांगितले की, मासिक पाळी ही एक नैसर्गिग प्रक्रिया मात्र समाजात असलेल्या गैरसमजुतीमुळे महिलांना आजही भेदभावाची वागणूक सहन करावी लागते. माहिती आणि सुविधांच्या अभावामुळे अनेक मुलींना शिक्षण सोडावे लागते. ज्याचा परिणाम त्यांच्या आर्थिक सक्षमतेवर होतो. योग्य स्वच्छतेअभावी गंभीर आजारांचा धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे या विषयावर उघडपणे बोलणे आणि शास्त्रीय माहिती घेणे काळाची गरज आहे.

यावेळी द लास्ट टूथ फाउंडेशनच्या अध्यक्ष संजीवनी अशोकराव टाकणखार यांनी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सुंदर बोंदर आणि डॉ. योगिता भगत यांचे आभार मानले. यावेळी डॉ. पूजा गीते, हौसाबाई टाकणखार, मीनाक्षी बामनकर, मीरा टाकणखार, अभिजीत उपस्थित होते.

## पैठण तालुक्यात वादळी वाऱ्यासह गारांचा पाऊस पडल्याने बळीराजाचे प्रचंड नुकसान


➤ **पैठण/ प्रतिनिधी :**
पैठण शहरासह तालुक्यातील सर्व ग्रामीण भागात काल सायंकाळच्या सहा वाजेच्या सुमारास जोरदार वारे वाहून ढगांच्या गडगडाट व विजांच्या कडकडाटासह जोरदार गारांचा पाऊस पडला .यामुळे शेतकऱ्यांच्या गहू मोसंबी, आंबा व डाळिंब या फळ पिकांचे मोठे नुकसान झाल्याने बळीराजावर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे. पैठण तालुक्यातील पिंपळवाडी ढोरकिन,आपेगाव, कातपूर, धनगाव, विहामांडवा, ढाकेफळ, लोहगाव बालानगर, बिडकीन, चितेगाव,नवगाव, कुरण पिंप्री खाम जळगाव,शाहपुर मानेगाव,७४जळगाव या भागासह ईतर ठिकाणी सायंकाळच्या सहा वाजेच्या सुमारास जोरदार वारे वाहून ढगांच्या गडगडाट व विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाला सुरुवात झाली .त्यात काही काळ विद्युत पुरवठा बंद झाल्याने जनजीवन विस्कळीत झाले होते .तर यातील आपेगाव, कडेढाण,कुरण पिंप्री या भागात गारा पडल्याने शेतकऱ्यांच्या गहू, मोसंबी व डाळिंब पिकांना चांगलाच फटका बसल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या अवकाळी पावसामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले असल्याने शासनाने त्यांना तातडीने मदत करण्याची मागणी होत आहे.



### महत्वाचे ठळक मुद्दे

● कुरण पिंप्री, आपेगाव, कडेठाण या भागातील शेत शिवारसह गावात गारा पडून त्यांचाखच साचला होता. पैठण शहरापासून काही अंतरावरील गोदापात्रा जवळील शेतात एका बाभळीच्या झाडावर सायंकाळी वीज कोसळली .श्रीक्षेत्र आपेगाव येथे वादळी वाऱ्यामुळे रस्त्यावर मोठे झाड पडले.

## भक्ती, श्रद्धा आणि सेवाभावाचा अनोखा संगम; वडवणीत हनुमान जन्मोत्सवाची भव्य तयारी





➤ **वडवणी : प्रतिनिधी**
संपूर्ण वडवणीकरांचे आराध्य दैवत असलेल्या श्री हनुमान जन्मोत्सवानिमित्त मोठा मारुती मंदिर, गावठाण येथे गुरुवार दि. २ एप्रिल २०२६ रोजी भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून सध्या यासाठी जय्यत तयारी सुरू आहे. विशेष म्हणजे यावर्षी इतिहासात प्रथमच हजारो भाविकांसाठी भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

मंदिर परिसरात सजावटीची कामे अंतिम टप्प्यात असून मंदिराच्या गाभाऱ्यातील ग्रेनाईट व आकर्षक फरशी, आत-बाहेर रंगरंगोटी, संपूर्ण शिखराचे सुशोभीकरण, कळसासह विद्युत रोषणाई यामुळे मंदिर नव्या रूपात उजळून निघाले आहे. "जय हनुमान" या एलईडी लाइटिंग बोर्डमुळे मंदिराचे आकर्षण अधिक वाढले आहे. या सुशोभीकरणामागे येथील युवक भाविकांचा मोठा वाटा असून त्यांनी घेतलेल्या संकल्पामुळे हे पुण्यकार्य पूर्णत्वास आले आहे. हनुमान मंदिर समिती, पंचकमिटी आणि समस्त वडवणीकरांचेही या उपक्रमाला उत्स्फूर्त सहकार्य लाभले आहे.
मागील काही वर्षांपासून बंद असलेली शनिवारची साप्ताहिक महाआरती व महाप्रसादाची परंपरा गेल्या दोन महिन्यांपासून पुन्हा सुरू करण्यात आली असून याला भाविकांचा उदंड प्रतिसाद मिळत आहे. महाआरतीच्या यजमानपदासाठी भाविकांमध्ये अक्षरश: उत्साहाचे वातावरण दिसून येत आहे.
यंदा गुरुवार दि. २ एप्रिल रोजी सकाळी ६ वाजता जन्मोत्सव सोहळा पार पडणार असून सकाळी ८ ते १० या वेळेत सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.
महाप्रसादासाठी इच्छुकांनी स्वेच्छेने देणगी देऊन या पुण्यकार्याला हातभार लावावा, असे आवाहन संयोजन समितीने केले आहे. देणगीसाठी माऊली उद्योग समूहाचे प्रमुख विनोद आसलकर (मो. ९७६७३५१९१९) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.
तरी पंचक्रोशीतील सर्व भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या भक्तिमय सोहळ्याचा लाभ घ्यावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# युवा शेतकरी संघर्ष समितीचा पुण्यात धडक इशारा; ऊस बिलासाठी साखर आयुक्त कार्यालयावर आंदोलन

➤ **माजलगाव : प्रतिनिधी**
शेतकऱ्यांच्या थकीत ऊस बिलासाठी युवा शेतकरी संघर्ष समिती आक्रमक झाली असून, काल दि ३० मार्च रोजी पुणे येथील साखर आयुक्त कार्यालयावर आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

मागील तीन महिन्यांपासून ऊस उत्पादक शेतकरी तसेच ऊस तोडणी व वाहतूकदारांचे पैसे थकलेले असल्याने संताप व्यक्त केला जात आहे. समितीच्या वतीने सांगण्यात आले की, साखर कारखाने व गुळ युनिट धारकांकडून जाणीवपूर्वक पैसे देण्यास टाळाटाळ केली जात आहे. त्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले असून, त्यांच्या कष्टाचे पैसे मिळत नसल्याने नाराजी वाढत आहे.



कायदा काय सांगतो?
केंद्र शासनाच्या साखर नियंत्रण आदेश नुसार : ऊस पुरवठ्यानंतर १४ दिवसांच्या आत पैसे देणे बंधनकारक विलंब झाल्यास १५% व्याजासह रक्कम अदा करणे आवश्यक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कारखान्यांवर RRC (Revenue Recovery Certificate) अंतर्गत कारवाईची तरतूद
मात्र, हे स्पष्ट नियम असतानाही अनेक कारखानदारांकडून शेतकऱ्यांच्या पैशांमध्ये विलंब होत असल्याचा आरोप समितीने केला आहे.

आंदोलनाचा इशारा
युवा शेतकरी संघर्ष समितीने प्रशासनाला स्पष्ट इशारा दिला आहे की, संबंधित कारखानदारांवर तात्काळ गुन्हे दाखल करावेत शेतकरी व तोडणी-वाहतूकदारांच्या खात्यात तत्काळ पैसे जमा करावेत अन्यथा, साखर आयुक्त कार्यालयाला घेराव घालून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.
लढा सुरूच राहणार
"शेतकऱ्यांचा हक्क मिळाल्याशिवाय लढा थांबणार नाही!" असा निर्धार समितीने व्यक्त केला असून, पुढील काळात आंदोलन आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे.